# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
तार - EDUTECH E mail Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्र.२/एनजोसी/संस्था-बदल/ २०१३/७७३
दिनांक : 27 JUN 2013

प्रति,
महसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/
अमरावती/नागपूर.

विषय :- द्वितीय वर्ष व तृतिय वर्ष अभियांत्रिकी/फार्मसी/वास्तुशास्त्र इत्यादी पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना संस्था स्थलांतर, अभ्यासक्रम बदल व विद्यापीठ स्थलांतर बदलीने प्रवेश मिळण्याबाबत.
**( शैक्षणिक वर्ष 2013-14 करिता )**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ मध्ये शासकीय व शासकीय अनुदानित संस्थेमधून दुस-या विना-अनुदानित संस्थेत तसेच एका विना-अनुदानित संस्थेमधून दुस-या विना-अनुदानित संस्थेमध्ये एकाच विद्यापीठा अंतर्गत असणा-या द्वितीय व तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमाकरीता बदली मिळण्याबाबत आपल्या कार्यालयाकडे विद्यार्थ्यांचे/पालकांचे अर्ज प्राप्त झाले असल्यास, प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची छाननी करुन आपल्या विभागा अंतर्गत येणा-या संस्थातील विद्यार्थ्यांच्या अर्जावर शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये संचालनालयामार्फत प्रकाशित झालेल्या **माहिती पुस्तिकेमधील (Information Brochure)** नियमाचे तंतोतंत पालन करावे व त्यानुसार संबंधित विद्यार्थ्यांच्या संस्था, अभ्यासक्रम व विद्यापीठ स्थलांतर बदली बाबत आपल्या स्तरावरुन कार्यवाही करण्यांत यावी. विद्यार्थ्यांच्या अर्जावर कार्यवाही करतांना विद्यार्थी ज्या संस्थेत शिकत आहे तसेच ज्या संस्थेत स्थलांतर बदलीने प्रवेश पाहिजे आहे, अशा दोन्ही संस्थांचे व अभ्यासक्रमाचा चॉईस कोड नमूद करण्यांत यावेत.

त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांच्या प्रवेशित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्रामध्ये सुपर न्यूमररी कोटयातील (जी.ओ.आय., जे अँड के, टी.एफ.डब्ल्यु.एस., एन.आर.आय, पी.आय.ओ इ. ) प्रवेश असल्यास त्याची संस्था बदल/अभ्यासक्रम बदल करु नये अथवा शिफारस करु नये. तसेच आपल्या विभागांतर्गत येत नसणा-या संस्था/विद्यापीठ स्थलांतर बदलीने प्रवेश मिळण्याबाबत विद्यार्थ्यांचे/पालकांचे विनंती अर्ज आपल्या कार्यालयास प्राप्त झाल्यास त्या अर्जावर स्थलांतर बदलीबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावर न करता आपल्या अभिप्रायासह सर्व विद्यार्थ्यांचे/पालकांचे विनंती अर्ज संबंधीत सर्व कागदपत्रासहीत त्वरीत या संचालनालयास पाठविण्यांत यावेत.

**तसेच विद्यार्थ्यांच्या बदली अर्जास अनुसरून संस्थांनी ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करतांना त्यात संबधित विद्यार्थ्यांचा प्रवेशाचा प्रकार (Seat Type), प्रवेशाचे माध्यम (केंद्रीभुत प्रवेश, व्यवस्थापन कोटा इ. ), संस्थेचा डीटीई संकेतांक व अभ्यासक्रम Choice कोड इ. बाबी नमूद करणे अनिवार्य राहील. म्हणून आपल्या कार्यकक्षेत येणा-या संस्थांना ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करतांना सदरहु बाबी नमूद करण्यास आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.**

( डॉ. सुभाष महाजन )
प्र. संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

---

**अतिमहत्वाचे**

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तंशिस/प्राकाना/शैवि–०१/२०१३/ 1902
दि. 28 JUN 2013

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व पदवी / पदवीका संस्था, नागपूर विभाग

यांना कळविण्यात येते की, संस्था बदलीकरीता विद्यार्थ्यांना ना—हरकत—प्रमाणपत्र देतेवेळी उपरोक्त पत्रात नमुद नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर